# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/04/2023 (शनिवार) सकाळ


### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कन्हान :—यातील फिर्यादी नामे— पुंडलीक संतोषराव कुरडकर, वय ५४ वर्ष, रा. न्यु गोडेगाव पुर्नवसन कन्हान यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे अप. क्र. २१४/२० कलम ३०२ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील **आरोपी नामे— संजय मारोती मेश्राम, वय ५२ वर्ष, रा. न्यु गोडेगाव पुर्नवसन कन्हान** हा मृतक नामे— निमुणाबाई मारोती मेश्राम, वय ८० वर्ष, रा. न्यु गोडगाव पुर्नवसन कन्हान यांचा मुलगा असुन ओोपी हा रागीट स्वभावाचा होता. आरोपी नेहमी मृतक हिचे सोबत झगडाभांडण करीत होता. यातील आरोपीने मृतक (आई) हिला दवाखान्यात नेण्याचा बहाणा करून घरून घेवुन जावुन झगडाभांडण केले व हातबुक्याने मारहाण करून आरोपीने सोबत आणलेल्या खिळयासारखी टोकदार वस्तु असलेल्या लाकडी दांडयाने मृतकाच्या कानपटावर मारून जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरण्याचे तपास सपोनि सतिश मेश्राम पोस्टे कन्हान यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २९/०४/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे. ०३ देशपांडे सा. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीसकलम ३०२ भांदवि मध्ये आरोपीला आजीवन कारावास व ५०००/—रू. दंड दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी नंदनवार यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोशि/१४६८ सैफुल्लाह अहमद पोस्टे कन्हान यांनी मदत केली आहे.

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ईंदीरा नगर वार्ड क्र. १ कन्हान येथे दिनांक ०४/०४/२०२३ चे ११.०० वा. ते ११.३० वा. दरम्यान **आरोपी नामे— 1) विशाल विष्णु मेश्राम, वय २८ वर्ष २) शुभम विष्णु मेश्राम, वय २५ वर्ष ३).विष्णु मेश्राम वय ५५ वर्ष ४).विक्की विष्णु मेश्राम वय २० वर्ष ५) सुनिता विष्णु मेश्राम ५० वर्ष, रा. ईदीरा नगर वार्ड क्र. १ कन्हान** यांनी फिर्यादी यांचे सोबत घराचे मधातली गल्लीत सामान ठेवण्याचे कारणावरुन फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ करुन विनयभंग केला व डोक्याला काठीने मारुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला तसेच विनयभंग करुन बलात्कार करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम २९४, ३०७, ३२३, ३५४(अ) (ब), ३७६ भा.द.वि. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/चव्हान पो.स्टे. कन्हान मो. नं ९९२३००२६६४ हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. काटोल :–** दिनांक ०१/१०/२०२२ ते दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंतचे सुमारास फिर्यादी पिडीता ही शिक्षण करीता बस ने येजा करीत असता **आरोपी नामे– बंटी उर्फ होमेश्वर धोटे, वय २१ वर्ष, रा. भिष्नूर ता. नरखेड** याचे सोबत ओळखी झाली व त्याचे रूपांतर प्रेमात झाले सदर आरोपी हा सदर पीडीता सोबत शारीरीक संबंध करू लागला यातुन पिडीता ही गर्भवती झाली आहे व त्या कारणामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन काटोलला येवुन तक्रार केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६(२) (एन), ३५४ अ (१) (आय), भादवी. सहकलम ४, ६ पोक्सो सहकलम ३ (१) (डब्लू) (प)ए ३(१) (डब्लू) (पप)ए ३(२) (पाचू) अनू जा अनू. ज. अ. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास एसडीपिओ अजय चांदखेडे मो. क्र. ९९२३१०७४१४ सावनेर विभाग सावनेर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर